

# रानमळा

वैष्णवी उराडे

# रानमळा

## वैष्णवी उराडे

ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान

# रानमळा

## वैष्णवी उराडे

गाव दगड्गाव
ता लोहा जिल्हा नांदेड
४३१७०८.
फोन : ९२८४५७२१२०
marotidhawale@gmail.com

या पुस्तकातील कवितांचे सर्व हक्क कवयित्रीकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा संगीत, नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी कवयित्रीची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान®
esahity@gmail.com
www.esahity.com
Published : 24 October 2017
©esahity Pratishthan® 2017
विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील कवितांचे सर्व हक्क कवयित्रीकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा एकांकिका, नाटक, सिनेमा, सिरियल, स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी कवयित्रीची परवानगी घेणे आवश्यक आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान




**शेतमळा** हा माझा पहिला कविता संग्रह आपल्या हाती देताना मला आनंद होत आहे.

लहानपणापासून मला कविता वाचण्याची खूप आवड होती. त्यानंतर मी चारोळ्या लिहायला सुरवात केली. महेश मोरे सरांच्या हिरवं रान पाऊस काळ हे कवितासंग्रह वाचून झाल्यावर शेतमळा हा कविता संग्रह लिहिला. सुट्टीच्या दिवसात शेतात जाऊन निसर्गाची ती निमुळती काया पाहून शब्दरचना झाली व शेतीवरील कविता लिहिल्या.

भगवान कस्तुरे यांनी मला अनेकदा प्रोत्साहित केले. त्यांचे व आपल्या सर्वांचे ऋण मानते.

सर्वांच्या पसंतीस माझा हा कविता संग्रह पडेल हि नम्रतापूर्वक अपेक्षा.

वैष्णवी उराडे

गाव दगड्गाव
ता लोहा जिल्हा नांदेड
४३१७०८.
फोन : ९२८४५७२१२०
marotidhawale@gmail.com



# अर्पणपत्रिका

मनाच्या कोपऱ्यात अंधकाराला दूर सारून प्रकाश निर्माण करणाऱ्या

कस्तुरे भगवान

यांना अर्पण

वैष्णवी उराडे

## १ ढग दाटुनिया आले

ढग दाटुनिया आले
झाला पाउस पाउस
थंडगार सुटलाय वारा
मला भिजण्याची आस

ढग दाटुनिया आले
सारा चिखल चिखल
पाय भरवावे त्यात
अस मनाला वाटलं

ढग दाटुनिया आले
गेल रान बहरून
गवताच हिरव धान
गातंय गोड गोड गान

ढग दाटुनिया आले
पक्षी सैरावैर झाले
ओढ खोप्याची लागली
झेप घेऊन पळाले

ढग दाटुनिया आले
आहे खर का? स्वप्न
येरे येरे पावसा तू
उगव मातीतलं रत्न.

## २ आस पावसाची

रंग भरला भरला
काळा निळा आभाळात
आस पावसाची लागे
धडधड होई काळजात

रान शिवार सुकलं
गवत गेलं होरपळून
पक्षी फिरती आकाशी
व्याकूळ तृष्णेला घेऊन

येरे येरे पावसा
तुला पाण्याची रं आण
टाक भिजवून धरती
उगव कि रं हिरवं सोन.

## ३ शेत

काळया काळया मातीमंदी
आज सोनं उगवलं
शेत शिवार फुलून
रान हिरवगार झालं

गवताच हिरव पान
गोड गोड गात गान

डोलुनिया वाऱ्यावरती
शेताला त्या फुलवती

शेत माझी जन्मभूमी
शेत माझीच माउली
आंब्याच्या त्या झाडाखाली
देते प्रेमाची सावली

पाटा पाण्याचा शेतात
पाणी खळखळ वाजत
पक्षी पाण्यात भिजून
छान खेळ खेळतात..



ई साहित्य प्रतिष्ठान

## ४ मी शेतकरी

काळी आई हिरवं सोनं
त्याच्यावर माझं जगनं

गुरे वासरे माझे सोबती
मी शेतकरी राबतो शेतावरी
धन धान्य पाला पाचोळा
सारे पक्षी होऊनी गोळा
फुलून जाते माझी नगरी
मी शेतकरी राबतो शेतामंदी

ढवळया पवळया सखे सोबती
उन पावसातही ती राबती
त्यांची जोडी हाय मला प्यारी
मी शेतकरी राबतो शेतामंदी..

## ५ माझ शेत

आज लखाटून गेल
माझं शेत हिरवळीनं
असं फुलुनिया उठलं
मदमस्त धन धान

झाला दमदार पाऊस
सांर पाणी पाणी झालं
काळया मातीमंदी आज
जणू उगवलं सोनं

माझं शेत माझी आस
लागलाय त्याचा ध्यास
त्याच्याविना जगनं हे
वाटे आता वनवास.

## ६ शेतमळा

हिरव्या सोन्याची ती खान
आज गेली बहरून
मोत्यापरी उगवले
शेतमळ्यातले धान

कापसाला शुभ्र रंग
ताठ उभारल्या तुरी
सर धावत सुटल्या
कापूस वेचाण्यास पोरी

झाड आंब्याचं ते उभं
मळ्याच्या त्या मधोमध
येता झोका वाऱ्याचा तो
तुटून पडते ती कैरी

जत्रा भरली मळ्यात
गेला सजूनिया मळा
भोवताली गवताने
गुंफल्यात हिरव्या माळा...



ई साहित्य प्रतिष्ठान

## ७ कष्ट

तृष्णा पाण्याची लागली
जीव करी ओढतान
कष्ट जीवापाड केले
तरीही वैराग्याच जीन

कष्टाला या माझ्या देवा
आहे मातीचं रं मोल
उभा उंच डोंगरही
आज दिसतोय खोल

काळया मातीत राबून
अंग घामाघूम झालं
पाऊस नसताना ओसरीत
कशी फुटली र ओल.

कशी फुटली रे ओल...

ई साहित्य प्रतिष्ठान

## ८ शेत शिवार

पाट्यावरचं पाणी
खळखळ वाहतं
मोर नाचे थुईथुई
मन हे गानं गातं

काळी आई माझी
आज नटून गेली
शेत गेलं फुलून
जादू निसर्गाने केली

बहरून गेला शिवार
दाटून आल पिक

आज माझ्या कष्टाला
लागल का र दृष्ट

शेतशिवारात माझ्या
गाय खातेय चारा
किती छान वाटतो
सुटलेला गार वारा..

## ९ पाऊस आला

येनं सकाळच्या पारी
आला पाऊस तो आला
सूर्य घेऊन किरणांना
काळ्या ढगाआड गेला

काळ्या काळ्या आभाळाचा
ढग पाण्यानं भरला
टीप टीप थेंबातूनी
खाली पाऊस उतरला

ओली चिंब झाली धरती
गंध मातीचा पसरला
झाडे डोलती मौजेने
वादळ वारा तो सुटला

किती पाऊस तो छान
धो धो आज र पडला
ऐकून ढगांचा तो नाद
जणू मृदंग गुंजला..

## १० क्षणभराचा पाऊस

आलं दाटून आभाळ
जणू झाली संध्याकाळ
ढगात बुडून गेलादिस
आला क्षणभराचा पाऊस

किती लागली होती आस
पार नुसताच होता भास
मन हे झाले र उदास
आला क्षणभराचा पाऊस

चार थेंब टपकली
अन ती नाहीशीच झाली
उडून गेला रं विश्वास
आला क्षणभराचा पाऊस...





ई साहित्य प्रतिष्ठान

# 11 काळ रान उनाडलं

पाऊस लोपला लोपला
आभाळ पडलाय फिक्क
आज मुरझुनिया गेली
मया मळ्यातली पीक

देव रुसला मयावारती
लेकर भोगतात भोग
त्यांच्या पोटी लागलीय
मुठभर दाण्याची र भूक

मऊ मऊ होत रान
झाल खडतर उनाड
दृष्ट लागली रानाला
पदरी पडलंय दुःख..

## १२ शेतकऱ्याच जिवन

रखरखत्या उन्हात
नरडी घेऊन तहान
बाप राबतो शेतात
घेऊन बैलांच वाहन

त्याचे कुजून गेले डोळे
झालाय तो दृष्टिहीन
लपलेल्या ढगामध्ये
वाट पावसाची पाहून

देव कोपालय आता
झाली सारी दाणादाण
हात थरथर कापे
अंगी नाही अवशान

**किती दयनीय हाय**
**शेतकऱ्यांचं जिवन..**

जेव्हा उगवती पिढी

लिहीती होते

आणि नवीन गळयांतून

गाणे येते

तेव्हा काळोखाची भिती

नाहिशी होते

अशा नव्या पिढीच्या सुर्यांसाठी

ई साहित्य प्रतिष्ठान हे एक व्यासपीठ आहे.

या व्यासपिठाला अधिक जोमाने बहरण्यासाठी

आपली मदत हवी आहे.

आपल्या किमान दहा मित्रांचे ई मेल पत्ते कळवा

esahity@gmail.com

